# भारताची कम्युनिस्ट पार्टी (माओवादी)
# केन्द्रीय कमेटी

## प्रसिद्धी पत्रक

## जनते पुढे सत्य उघड केल्यास दुसऱ्याचं क्षणी तुमची सत्ता कोसळणार!

### आमच्या वक्तव्यात दिलेल्या तथ्यांना स्वीकारल्यास रवींद्र कदमला नौकरी पासुन मुकावे लागणार!!

आंतरराष्ट्रीय कामगार दिवस 'एक मे' या दिवसाच्या निमित्ताने मी आपल्या केन्द्रीय कमेटी तर्फे ''पोलिस व अर्धसैनिक बलांना आव्हान'' म्हणुन विधान दिलेले होते. ह्या विधानाला आपल्या पत्रिकांमध्ये व वृत्तपत्रांमध्ये जागा देणाऱ्या अनेक प्रबंधकां प्रति मी आभार व्यक्त करीत आहो. त्या विधानात मी जी काही वास्तविकता दाखविण्याचा प्रयत्न केला त्याला महाराष्ट्राच्या नागपुर विभागातील महा निदेशक रवीन्द्र कदम यांनी खारीज केले होते व प्रसार माध्यमां मार्फत त्याचे खण्डन ही केले होते. परंतु, मी परत एकदा स्पष्ट करू इच्छीतो कि मागे मी केलेलं विधान हे पुर्णतः सत्य आहे. माझ्या त्या विधानात जर काही असत्यता असल्यास सिद्ध करावे. आमचे मागील विधान इंददमक जीवनहीजण्ण्ण्व्तह बरोबर अन्य साइटांवर उपलब्ध आहे. देशातील सर्व प्रसिद्ध बुद्धिजीवी, लोकशाही प्रेमी, लेखक, कलाकारां बरोबर सरकारी कर्मचारी आणि खास करून पोलिस कर्मींनी जरूर त्याला वाचावे.

त्या विधानातील कुठल्या तथ्याला रविंद्र कदम नाकारणार?

1. सर्व पोलिस आणि अर्धसैनिक बलात कार्यरत असलेले कामगार वर्गातुन आलेले नाही आहेत का?
2. देशातील अनेक भ्रष्टाचाराच्या घोटाळ्यात लिप्त असे किती नेतागणांना कारागृहाची सजा झालेली आहे उलट अश्या बदनाम नेत्यांच्या सुरक्षेसाठीच पोलिसांची तैनाती केल्या जात आहे ना?
3. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग वर लागलेला कोलगेट घोटाळ्याचा आरोप खोटा आहे काय?
4. 2002 साली गुजरात मध्ये झालेल्या मुस्लिम नरसंहार, त्यांचे झालेले विस्थापण ज्या विरोधात अमेरिका बरोबर अनेक युरोपीय देशांनी नरेंद्र मोदी वर लावलेला प्रतिबंध; काय यापासुन आईजी कदम अनभिज्ञ आहेत. सांगा कदम! काय हे खोटं आहे?
5. सध्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या खा.ऊ.जा. नीति अंतर्गतच कार्पोरेटांना अनुकूल 'मेक इन इंडिया' ज्याने फक्त आदिवासी, शेतकऱ्यांचे पीके, जमीनी आणि जंगल नष्ट होणार आणि हे जर सत्य नसते तर देशातील करोडो जनता का विरोध करीत असती? भूमि अधिग्रहण विधेयकाचे कायद्यात परिवर्तना साठी सरकारला का ऐवढी तारे वरची कसरत करावी लागत आहे?
6. देशात सद्या संघ परिवारा द्वारा मुस्लिम, ख्रिश्चन आणि अल्पसंख्यांक जनतेवर चालविले जात असलेल्या हल्ल्यांना काय खाकी वर्दीच्या प्रभावात असलेले कदम नाकारणार? पण जगातील जनतेचे डोळे तर बंद नाही ना!
7. 2013-2014 या वर्षात अर्धसैनिक बलांद्वारा दिलेल्या राजीनाम्यांना कसे नाकारू शकता! कदाचित आपल्या बलांचे मनोबल वाचविण्याचे सोडुन काय आपण हे स्वीकारणार?
8. देशातील एक तृतीयांश खासदारांची अपराधी पार्श्वभूमी आहे काय हे आपणास मान्य आहे?
9. किमान सुविधांच्या अभावा मुळे अनेक पोलिस आणि बलांना आपल्या नौकरी दरम्यान होणाऱ्या समस्यांना नाकारणार?
10. छत्तीसगड राज्य सरकार द्वारा केंद्रीय बलांवर खर्च होणाऱ्या 2500 करोड रुपये खर्च करण्याबाबत जाहीर केलेल्या असमर्थतेला नाकारू शकणार?

माझ्या विधानात प्रमुख रूपाने हेच तथ्य होते आणि ह्या तथ्यांचा उल्लेख मी कुठल्याही प्रकारे आमच्या पार्टीच्या दस्तावेजा तुन केलेला नाही. ह्या सर्व तथ्यांना खारीज करणाऱ्या आईजी कदम ने अगोदर प्रसार माध्यमां द्वारा प्रसारीत व प्रकाशित बातम्या व खाली दिलेल्या साईटांना जरूर भेट देऊन आपला निर्णय देणे योग्य राहणार.

1. IPCS.Org मध्ये Red affairs बिभु प्रसाद यांचा लेख 01/12/2014
2. Sanhati.com. मेरिटारियस सर्विस अवार्ड टू SPR कल्लूरी-कन्सर्नड सिटिजन्स 27/01/2013
3. Sanhati.com. - Don't like facts, change facts on the ground'
4. Tehelka.com
   1. बुलेटिन 50 13/12/2014
   2. प्रियंका कौशल 31/12/2014 ची रिपोर्ट
5. force in india.net Push against the wall गजल वाहब यांचा लेख
6. BBC.hindi.com गोलियों से नही आत्महत्याओं से मरे 15/05/2015
7. Zeenews.india.com Heart attacks, sicide killings more.... 12/01/2015
8. New Indian Express Police vs Maoists _ Yatish Yadav 28/04/2015

या सर्व तथ्यांच्या आधारावर मी कदमच्या सर्व आरोपांचे खण्डन करण्यासाठी सर्व वाचकांना आव्हान करीत आहो.

पेसा कायद्या प्रति कदमला जरा देखिल सम्मान असेल तर त्यांनी उडेरा ग्रामवासी मैना बाई पुंगाटि यांच्या बरोबर केलेल्या अभद्र व्यवहार करणाऱ्या दोषींना शिक्षा देण्याचे आश्वासन ग्रामवासीयांना दिले पाहिजे. 17 मे 2015 रोजी महाराष्ट्र राज्यातील गडचिरोली जिल्हातील उडेरा गावातील रहिवासी मैनी पुंगाटि (40 वर्ष) यांवर तुमच्या बहादुर सी-60 कमाण्डो ने माओवादी असल्याचा खोटा आरोप लावुन मारझोड केली व त्यांची शारीरिक छेडछाड करण्यात आली ज्या विरोधात दोषीं वर आईपीसी कलम 307 अंतर्गत आरोप दाखल करण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक एटापल्ली तहसिलात एकत्र होऊन न्यायाची मागणी केली. या विषयी आपल्या पोलिस प्रशासनाचे काय म्हणने आहे, जनतेला सांगा!

माननीय कदम; जो पर्यंत आपण या खाकी वर्दीत आहात तोपर्यंत तुमच्या बलांचे मनोबल शाबूत ठेवण्यासाठी हे सर्व करावे लागणार. पण, तुमची खाकी वर्दी उतरताच तुम्हाला प्रायश्चित होणार. न्यायालयाच्या कठड्यात गीतेला साक्षी ठेऊन दिल्या जाणाऱ्या साक्षीदारांची जेवढे सत्यता असणार, आपल्या विधानात देखिल असणार परंतु; खरे बोलल्यास आपली नौकरी जाणार!

Abhay

(अभय)

प्रवक्ता, केन्द्रीय कमेटी

भारत की कम्युनिस्ट पार्टी (माओवादी)

दिनांक: 20 जुलाई 2015